**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २७ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **भारताचे माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांचं निधन, देशभरात सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर, उद्या सकाळी होणार शासकीय इतमामात अंत्यसंस्कार.**
2. **डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधानांसह जागतिक नेते आणि सर्वच स्तरातून शोक संवेदना व्यक्त.**
3. **आधुनिक सुधारणांमुळे नागपूर मध्ये गुन्ह्यांच्या दरात 14 टक्के घट- आयआयएम बंगलोरचा अहवाल.**
4. **साहित्य अकादमी आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यामाने उद्या २८ डिसेंबरला 'मराठीतील वाङ्मयीन आणि वैचारिक नियतकालिके' या विषयावर परिसंवाद.**

**आता सविस्तर बातम्या** .......

मनमोहन सिंग निधन

माजी प्रधानमंत्री डॉ.मनमोहन सिंग यांचं काल नवी दिल्ली इथं वृध्दापकाळानं निधन झालं. ते ९२ वर्षांचे होते. काल संध्याकाळी प्रकृती गंभीर झाल्यामुळे त्यांना नवी दिल्लीतल्या एम्स रुग्णालयात दाखल केलं होतं. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. 26 सप्टेंबर 1932 रोजी फाळणीपूर्व भारताच्या पंजाब प्रांतातल्या एका गावात जन्मलेल्या, डॉ.मनमोहन सिंग यांनी 2004 ते 2014 या काळात काँग्रेसच्या नेतृत्वाखालच्या यूपीए सरकारमध्ये सलग दोन वेळा प्रधानमंत्री पदाचा कार्यभार सांभाळला. ऑक्सफर्डमधून अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवल्यावर मनमोहन सिंग यांनी काही काळ संयुक्त राष्ट्रांसाठी काम केलं. 1971 मध्ये, ते भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयात आर्थिक सल्लागार म्हणून रुजू झाले. त्यांनी अर्थ मंत्रालयात मुख्य आर्थिक सल्लागार आणि सचिव, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, प्रधानमंत्र्याचे सल्लागार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही काम केलं. डॉ. मनमोहन सिंग यांनी 1991 आणि 1996 मध्ये केंद्रीय अर्थमंत्री म्हणून काम केलं, आणि आर्थिक सुधारणांचं व्यापक धोरण आखलं. तत्कालीन प्रधानमंत्री पीव्ही नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारमध्ये अर्थमंत्री असलेले डॉ.सिंग यांना 1991 मधल्या आर्थिक सुधारणांचे शिल्पकार समजलं जातं, ज्याने आर्थिक उदारीकरणाच्या युगाची सुरुवात झाली. डॉ. सिंग 1991 ते 2024 या काळात राज्यसभेचे सदस्य होते. 33 वर्षांच्या सेवेनंतर ते यंदाच्या एप्रिलमध्ये राज्यसभेतून निवृत्त झाले. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, माहितीचा अधिकार कायदा आणि राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा, हे डॉ.मनमोहन सिंग यांनी आपल्या प्रधानमंत्रीपदाच्या कार्यकाळात घेतलेले महत्वाचे निर्णय होते. डॉ.मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर नवी दिल्ली इथं उद्या संपूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या निधनाबद्दल सरकारनं ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे.

शोक संवेदना

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. डॉ सिंग हे अशा दुर्मिळ राजकारण्यांपैकी एक होते, ज्यांनी शैक्षणिक आणि प्रशासकीय अशा दोन्ही विश्वात आपला ठसा उमटवला, असं राष्ट्रपतींनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. डॉ. मनमोहन सिंग हे असामान्य अर्थतज्ञ होते, ज्यांनी भारताच्या आर्थिक परिप्रेक्षात परिवर्तन घडवलं, असं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताच्या आर्थिक धोरणावर मजबूत ठसा उमटवल्याचं पंतप्रधान **नरेंद्र मोदी** यांनी म्हटलं आहे. डॉ. सिंग यांनी आपल्या प्रधानमंत्री पदाच्या कार्यकाळात सर्वसामान्य नागरिकांचं जीवन सुधारण्यासाठी केलेल्या व्यापक प्रयत्नांची त्यांनी प्रशंसा केली आहे. डॉ.मनमोहन सिंग यांनी आरबीआयचे गव्हर्नर ते अर्थमंत्री आणि प्रधानमंत्री म्हणून देशाच्या कारभारात महत्त्वाची भूमिका बजावल्याचं केंद्रीय गृहमंत्री **अमित शाह** यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. डॉ. सिंग यांच्या नेतृत्वानं पक्षपातळीवर प्रशंसा आणि आदर मिळवला असून, त्यांचा वारसा पिढ्यानपिढ्या राष्ट्र उभारणीसाठी प्रेरणा देत राहील, असं भाजपा अध्यक्ष **जेपी नड्डा** यांनी म्हटलं आहे. डॉ. सिंग यांचे नेतृत्व, नम्रता आणि समर्पण सदैव स्मरणात राहील, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री **अश्विनी वैष्णव** यांनी म्हटलं आहे. भारतानं एक दूरदर्शी राजकारणी, अभेद्य एकतेचा नेता आणि अतुलनीय उंचीचा अर्थतज्ज्ञ गमावल्याचं काँग्रेस अध्यक्ष **मल्लिकार्जुन खर्गे** यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. डॉ. मनमोहन सिंग यांनी असामान्य शहाणपण आणि सचोटीनं भारताचं नेतृत्व केलं. त्यांची नम्रता आणि अर्थशास्त्राची सखोल जाण यामुळे देशाला प्रेरणा मिळाली, असं काँग्रेस नेते **राहुल गांधी** यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. माजी प्रधानमंत्री डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल महाराष्ट्राचे **राज्यपाल सी पी राधाकृष्णन** यांनी शोक व्यक्त केला आहे. भारताचे अर्थमंत्री म्हणून सर्वात आव्हानात्मक काळात त्यांनी देशाला आर्थिक संकटातून यशस्वीपणे पुढे नेलं आणि जागतिकीकरण आणि उदारीकरणाचा पाया घातला, असं त्यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले, कॅबिनेट मंत्री रामदास आठवले यांनी माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल जगभरातल्या नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे. अफगाणिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष हमीद करझाई, मालदीवचे माजी राष्ट्राध्यक्ष मोहम्मद नाशीद, भारतातले रशियाचे राजदूत डेनिस अलीपोव्ह यांनी डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल समाज माध्यमावर शोक व्यक्त केला आहे.

रिझर्व्ह बँक

देशातल्या बँकांच्या नफ्यात २०२३-२४ या आर्थिक वर्षापर्यंत सलग सहा वर्षं वाढ झाली असून, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीतही वाढीचा कल कायम असल्याचं भारतीय रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. रिझर्व्ह बँकेनं देशातील बँकिंग आणि त्यातला कल याबाबतचा एक अहवाल काल प्रसिद्ध केला, त्यात ही माहिती देण्यात आली आहे.

स्मार्ट सिटीज मिशन

स्मार्ट सिटीज मिशनचा एक भाग म्हणून नागपूर शहरांने  विशेषतः शहरी सुरक्षा आणि डिजिटल शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती नोंदवली आहे.  यासाठी आय आय एम बंगलोर द्वारे विविध मुद्द्यांचे तपशीलवार परीक्षण करण्यात आले.  त्या आधारावर केलेल्या सुधारणांमुळे नागपूर मध्ये एकूणच गुन्हेगारीच्या दरात 14 टक्के घट नोंदवण्यात आली आहे. यासाठी नागपूर स्मार्ट अँड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड ने राबवलेल्या विविध तंत्रज्ञान आधारित आणि सुरक्षा विषयक उपाययोजनांचा यात समावेश आहे. याशिवाय शिक्षण क्षेत्रात देखील स्मार्ट क्लासरूम आणि डिजिटल लायब्ररीच्या माध्यमातून अनेक सुधारणा झाल्यामुळे आजपर्यंत  सहा स्मार्ट स्कूल्स मध्ये साठ डिजिटल क्लासरूम शिक्षणाचा दर्जा वाढवण्यामध्ये योगदान देत आहे.

क्षयरोग

क्षयरोगाच्या प्रसाराचे प्रमाण आणि मृत्यूदर कमी करुन देश क्षयरोगमुक्त करण्यासाठी केंद्र शासनाने ७ डिसेंबरपासून देशपातळी क्षयरोग उच्चाटन मोहीम सुरु केली आहे. २४ मार्च २०२५ पर्यंत ही मोहीम सुरु राहणार आहे.गडचिरोली जिल्हयात या मोहिमेने वेग घेतला आहे. या बद्दल अधिक माहिती जाणून घेऊया जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सचिन हेमके यांच्या कडून -

***आपल्या जिल्ह्यामध्ये आपण निक्षय शिबीर २२८ घेण्यात आलेले आहेत. यामध्ये अतिजोखमीच्या २० हजार ३६८ लोकसंख्याची पण चाचणी केलेली आहे आणि त्यामध्ये ६७ लोकांची निदान करून त्यांना औषोधोपचारावर आणलेले आहेत. माझी गडचिरोली जिल्ह्यातील सर्व जनतेला अशी विनंती आहे, कि त्यांनी सुद्धा अश्याप्रकारचे लक्षण आढळल्यास आपल्या आजूबाजूच्या ठिकाणी लक्षणे आढळल्यास त्यांना त्वरित त्यांची खोकल्याची तपासणी, ठस्यांची तपासणी, तसेच एक्सरे करण्यासाठी त्यांना सांगावे जेणेकरून आपण त्या रुग्णास लवकरात लवकर निदान करून त्यांना उपचारासाठी आणू शकतो, आणि आपला समाज हा टी.बी. मुक्त करू शकतो.***

डॉ.पंजाबराव देशमुख

देशाचे पहिले कृषी मंत्री, कृषी क्रांतीचे जनक,शिक्षण महर्षि डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या 126 व्या जंयती निमित महाराज बाग चौक नागपुर इथल्या डॉ. पंजाबराव देशमुख स्मारकावर आज आमदार डा.परिणय फुके, किशोर जिचकार, प्राचार्य  बबनराव तायवाडे, बहुजन विचार मंचचे मुख्य संयोजक नरेन्द्र जिचकार यांनी अभिवादन केलं.

बॉर्डर-गावस्कर

ऑस्ट्रेलियात मेलबर्न इथं सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्याच्या आज दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाने  पहिल्या डावात सर्व बाद ४७४ धावा केल्या. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय फलंदाजी गडगडली. विराट कोहली आणि के एल राहुल हे दोघं अनुक्रमे ३६ आणि २४ धावांवर बाद झाले. रोहित शर्मा अवघ्या तीन धावा करू शकला तर आकाशदीप शून्यावर बाद झाला. सलामीला उतरलेल्या यशस्वी जयस्वालने ८२ धावा केल्या. या धावांच्या बळावर आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताच्या पाच बाद १६४ धावा झाल्या होत्या.

हवामान

विदर्भात आज आणि उद्या विविध जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आज अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, वर्धा आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये मेघगर्जानेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यामध्ये  बुलढाणा, अकोला आणि अमरावती इथं गारपीट होण्याची देखील शक्यता आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये हवामान सामान्य राहण्याचा अंदाज असून उद्या अमरावती, नागपूर, भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर या ठिकाणी मेघगर्जानेसह  पाऊस पडू शकतो.

धान खरेदी

आधारभूत किंमत धान खरेदी योजना खरीप पणन हंगाम 2024-25 करिता धान खरेदी करीता ऑनलाईन शेतकरी नोंदणीसाठी 15 डिसेंबर ही अखेरची मुदत देण्यात आली होती. सदर योजनेचा लाभ सर्व शेतकऱ्यांना होण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी शासनाने 31 डिसेंबर पर्यन्त मुदतवाढ दिली आहे.

साहित्य अकादमी

साहित्य अकादमी आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यामाने २८ डिसेंबरला ‘मराठीतील वाङ्मयीन आणि वैचारिक नियतकालिके’ या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.विदर्भ साहित्य संघातील अमेय सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता ज्येष्ठ साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. यावेळी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते आणि   आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. उद्घाटनानंतर दुपारी १२ वाजता ‘वाङ्मयीन नियतकालिके’ या विषयावर परिसंवाद होणार आहे. दुपारनंतर ‘वैचारिक नियतकालिके’ या विषयावर परिसंवाद होणार आहे. दुपारी ४ वाजता ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांच्या उपस्थित समारोप होणार आहे.

******